# साहित्य अकादमीच्या वतीने चांदाळा येथे ग्रामालोक कार्यक्रम

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नागपूर :** नवी दिल्ली येथील साहित्य अकादमीच्यावतीने गडचिरोली जिल्ह्यातील चांदाळा येथील माध्यमिक आश्रमशाळेत शनिवार, ३० ऑगस्टला दुपारी १२ वाजतापासून 'ग्रामालोक' कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात गडचिरोली जिल्ह्याच्या ग्रामीण परिसरातील नाटककार आणि आदिवासी साहित्यिक त्यांचे सादरीकरण करणार आहेत.

ग्रामीण परिसरातील लोककला, लोकजीवन आणि साहित्य यांना व्यासपीठ मिळावे यासाठी भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाअंतर्गत 'ग्रामालोक' कार्यक्रमाचे ग्रामीण भागात आयोजन केले जाते. चांदाळा येथील 'ग्रामालोक' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी झाडीपट्टीचे लेखक आणि कलावंत नवरगाव येथील प्राचार्य सदानंद बोरकर उपस्थित राहतील. तसेच गडचिरोली येथील नाटककार चुडाराम बल्हारपुरे, कुरखेडा तालुक्यातील नाटककार विश्वंभर गहाणे नाट्यनिर्मितीचे अनुभव कथन करणार आहेत. या कार्यक्रमात महाराष्ट्रातील आदिवासी कवयित्री व कार्यकर्त्या कुसुम अलाम आदिवासी साहित्य व संस्कृतीबद्दल मार्गदर्शन करणार आहेत.

तर पुराडा येथील लेखिका संगीता ठलाल या झाडीपट्टीतील रानभाजी व वनौषधीबद्दल अनुभव कथन करणार आहेत.

या कार्यक्रमाला साहित्य अकादमी, नवी दिल्लीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन चांदाळा माध्यमिक आश्रमशाळेतील यशोधरा उसेंडी करणार आहेत. नागरिकांनी 'ग्रामालोक' कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक सतीश पवार यांनी केले आहे.